# ओव्हल मैदानावरील क्रिकेट थांबणार नाही!

'मेट्रो-३'मुळे खेळपट्ट्यांना बाधा नाही

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गाच्या बांधकामामुळे ओव्हल मैदानावरील खेळपट्ट्यांना कोणत्याही प्रकारची हानी पोहोचणार नसून, तेथील क्रिकेट सामन्यांनाही अडथळा येणार नाही, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने स्पष्ट केले आहे. मात्र मेट्रोच्या बांधकामासाठी आझाद मैदानावरील काही खेळपट्ट्यांचे स्थलांतर करावे लागणार असून, जास्तीत जास्त खेळपट्ट्या उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा विभागाशी चर्चा केली जात आहे, असे कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.

मेट्रो-३च्या बांधकामामुळे या दोन्ही मैदानांवरील क्रिकेटच्या खेळपट्ट्यांची हानी होईल आणि मैदाने काबीज होऊन खेळावर गंडांतर येईल, असा सूर खेळाडूंमध्ये उमटत असून, त्यासाठी त्यांनी



चळवळही सुरू केली. त्यावर भिडे यांनी भूमिका स्पष्ट केली. एकूण ९ हेक्टर म्हणजेच ९० हजार चौरस मीटर ओव्हल मैदानापैकी केवळ ०.३९ हेक्टर म्हणजे ३९०० चौरस मीटर (संपूर्ण मैदानाच्या ४ टक्के) इतकी जागा मेट्रो-३साठी तात्पुरत्या स्वरूपात लागणार आहे. तीन ते चार वर्षांनंतर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मैदानाचा भाग पूर्ववत केला जाईल. ही जागा मैदानाच्या उत्तरेस असल्यामुळे खेळाला कोणत्याही स्वरूपाची बाधा पोहोचणार नाही, असे भिडे म्हणाल्या.

## आझाद मैदानाचीही जागा घेणार

आझाद मैदान हे २० हेक्टर जागेवर पसरलेले असून त्यापैकी ३.२७ हेक्टर जागा मेट्रोसाठी आवश्यक आहे. प्रेस क्लबमागील ही जागाही बांधकामानंतर पूर्ववत केली जाईल. तसेच या ठिकाणी आणखी सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असेही त्या म्हणाल्या.